महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०० वे | दिनांक : ०३/०४/२०२६ | वार : शुक्रवार

## प्रफुल्ल पटेल-सुनील तटकरेंची पार्थ पवारांकडून पाठराखण

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत चर्चांना आता नवं वळण मिळालं आहे. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्यादरम्यान प्रफुल्ल पटेल यांच्या अनुपस्थितीवरून रंगलेल्या चर्चांमध्ये पार्थ पवार यांनी उडी घेत, पटेल आणि सुनिल तटकरे यांच्यावरील आरोप पूर्णपणे निराधार असल्याचा ठाम दावा केला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय वातावरण अधिक तापलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सध्या सुरू असलेल्या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्यादरम्यान वरिष्ठ नेते प्रफुल पटेल यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली. प्रफुल पटेल कुठे आहेत? या पत्रकारांच्या प्रश्नावर सुनेत्रा पवार यांनी ते कधी येतात, कधी जातात हे तुम्हालाच माहिती असेल, असा टोला लगावल्याने चर्चांना अधिकच उधाण आलं. या पार्श्वभूमीवर पक्षात सर्व काही सुरळीत आहे का, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

या सर्व चर्चांमध्ये आता पार्थ पवार यांनी स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांच्याविरोधात सुरू असलेल्या बातम्या पूर्णपणे निराधार असल्याचं म्हटलं आहे. अनेक दशकांपासून या नेत्यांनी पक्षासाठी दिलेलं योगदान मोठं असून, त्यांच्या नेतृत्वामुळेच पक्षाला दिशा मिळत असल्याचं पार्थ पवार यांनी नमूद केलं. तसेच, केवळ तर्क-वितर्कांवर आधारित कथा पसरवून वरिष्ठ नेत्यांना लक्ष्य करणं अत्यंत दुर्दैवी असल्याची टीकाही त्यांनी केली.
दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाची सूत्रे सुनेत्रा पवार यांच्या हातात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद वाढल्याच्या चर्चा सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी आमदार रोहित पवार यांनी प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर पक्षातील समीकरणांबाबत संभ्रम निर्माण झाला होता. त्यातच, दिल्ली दौऱ्यात दोन्ही वरिष्ठ नेते सुनेत्रा पवार यांच्यासोबत दिसले नाहीत, यामुळे या चर्चांना अधिक बळ मिळालं.
विशेष म्हणजे, प्रफुल्ल पटेल दिल्लीमध्ये असल्याची माहिती असूनही ते सुनेत्रा पवार यांच्या बैठकीत दिसले नाहीत. दुसरीकडे, सुनिल तटकरे हे हनुमान जयंतीनिमित्त रायगडमध्ये असल्याचं सांगितलं जात आहे. या दोन्ही नेत्यांची एकाच वेळी अनुपस्थिती राजकीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काहीतरी वेगळं घडत असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत.

याशिवाय, पक्षाच्या संविधानात झालेल्या बदलांमुळेही वाद वाढला आहे. २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय अध्यक्ष निवडीच्या प्रक्रियेदरम्यान निवडणूक आयोगाला पाठवलेल्या मिनिट्समध्ये बदल झाल्याचं समोर आलं आहे. नव्या संविधानात काही फ्रंटल सेल वगळण्यात आल्याची माहितीही समोर आली आहे. या सर्व घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेली अंतर्गत हालचाल अधिकच तीव्र झाली असून, पुढील काळात या वादाचं रूप काय घेतं याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेत भाजपची सत्ता कायम



**छत्रपती संभाजीनगर** : जिल्हा परिषदेत सभापती पदावरही भाजपने आपले वर्चस्व कायम राखले आहे. अध्यक्षपदानंतर आता सभापती पदाची निवडणूकही बिनविरोध होणार आहे, ज्यामुळे भाजपची सत्ता अधिक मजबूत झाली आहे.

महाविकास आघाडीकडून कृष्णा पाटील डोणगावकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) कडून वरून पाथ्रीकर यांनी उमेदवारी अर्ज खरेदी केले होते. मात्र, निर्धारित वेळेत अर्ज दाखल न केल्याने त्यांनी माघार घेतल्याचे स्पष्ट झाले. यामुळे सभापती पदासाठीची निवडणूक बिनविरोध पार पडणार आहे.

भाजपने मीनाक्षी पवार आणि अनिता मोठे यांना सभापती पदासाठी संधी दिली आहे. याशिवाय, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून बालाजी सोनटक्के आणि अपक्ष असूनही भाजप पुरस्कृत सचिन गरड यांचाही समावेश आहे. दुपारी दोन वाजेनंतर अधिकृत विजयाची घोषणा अपेक्षित आहे.

यापूर्वी अध्यक्षपदाच्या निवडणुकीत दोन्ही शिवसेना गट एकत्र येऊन भाजपविरोधात समीकरणे जुळवण्याचा प्रयत्न करत असल्याची चर्चा होती. मात्र, भाजपने अपक्ष सदस्यांची साथ मिळवत सत्ता आपल्या बाजूने खेचण्यात यश मिळवले. यामुळे जिल्हा परिषदेवर भाजपचे वर्चस्व अधिक बळकट झाले आहे.

उबाठा गटाचे जिल्हा परिषद सदस्य कृष्णा डोंणगावकर यांनी पक्षाचा 'व्हीप' झुगारत उमेदवारी अर्ज विकत घेतला. यानंतर त्यांनी शिवसेना खासदार संदीपान भुमरे यांची भेट घेत तुमचे आणि भाजपचे पटत नसेल, तर तटस्थ राहण्याऐवजी मला मतदान करून मदत करा, असे म्हटले. मात्र दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत असताना त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. यामुळे आता भाजपचे उमेदवार बिनविरोध झाले आहेत.

## साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार : ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील व साहित्यिक कौतिकराव ठाले-पाटील यांना जाहीर



**अंबाजोगाई** : साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील व साहित्यिक प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांना जाहीर झाला आहे. थोर समाजसेवक बाबा आमटे आणि त्यांच्या कार्याला खंबीर साथ देणाऱ्या साधनाताई आमटे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे (1926–2026) औचित्य साधून 2026 पासून 'साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार' एका दांपत्याला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष असून शाल, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पहार व एक लक्ष रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली.
दगडू लोमटे हे गेली ४० वर्षे आनंदवनाशी जोडले आहेत. त्यांनी पुरस्कार सुरू करावा असा प्रस्ताव मांडला. संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी तो मान्य केला. पुरस्कार निवडीसाठी अमर हबीब, डॉ. शैलजा बरुरे व बालाजी सुतार यांची निवड समिती नेमली होती. त्यात दगडू लोमटे व डॉ. शुभदा लोहिया यांनी संस्थेचे सदस्य म्हणून काम केले. या पुरस्काराचा वितरण समारंभ, ठिकाण व तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे.
अनुराधाताई पाटील यांनी 'दिगंत', 'तरीही', 'दिवसेंदिवस', 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ', 'कदाचित अजूनही', 'आता व्हा सगळ्या बुडीत खाती' हे कवितासंग्रह, 'नवसाला पावली डॉक्टरीण' हा प्रौढ साक्षरांसाठी दीर्घ कथासंग्रह व 'दरअसल', 'अनुराधा पाटील री टाळावीं मराठी कवितावां' राजस्थानी व 'हत्या केवल शब्द नही हैं' हे हिंदी अनुवादित कविता संग्रह प्रकाशित आहेत. त्याच बरोबर उडिया कविता, हिंदी कथा व कवितांची मराठीतील भाषांतरे प्रकाशित आहेत. त्यांच्या कवितांचे हिंदी, उर्दू, उडिया, पंजाबी, राजस्थानी, मल्याळम, बंगाली, जपानी, इंग्रजी या भाषेतील नियतकालिकेतून त्यांचे साहित्य अनुवादित होऊन प्रकाशित झाले आहे. त्यांच्या साहित्य कार्याला साहित्य अकादमी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील मान्यताप्राप्त साहित्य संस्थांचे मानाचे 25 हून अधिक पुरस्कार मिळालेले आहेत.
साहित्य अकादमी पुरस्कार निवड समितीच्या तज्ज्ञ परीक्षक, जैन फौउंडेशन पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्ष, राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय (विविधभाषा) कवी संमेलन, चर्चा सत्रे, प्रतिष्ठेच्या केरळ साहित्य महोत्सव, जयपूर साहित्य महोत्सव, मुंबई साहित्य महोत्सवात मराठी भाषेच्या कवी म्हणून निवड झाली होती. विविध भाषिक संमेलनाच्या उद्घाटक, अनेक संमेलनात व आकाशवाणी दूरदर्शनवर मुलाखती झाल्या. शालेय अभ्यासक्रमात व अनेक विद्यापीठात मराठी अभ्यासक्रमात त्यांची अनेक पुस्तके लागलेली आहेत. मराठवाडा साहित्य परिषद, , प्रतिष्ठान मासिकाचे संपादक मंडळ, साहित्य अकादमी महाराष्ट्र, राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, भारतीय भाषा परिषद कलकत्ता या संस्थांचे त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे. महत्वाचे साहित्य अकादमी दिल्ली येथे पाच वर्षे सदस्य म्हणून उत्तम कार्य केले आहे.
कौतिकराव ठाले पाटील हे उत्तम प्रशासक, लेखक, संघटक, शिक्षणतज्ज्ञ म्हणून सुपरिचित आहेत. त्यांची 'संमेलनाच्या मांडवाखालून', 'मराठी भाषिक आणि साहित्य– संकृती', हे ग्रंथ व 'वाचनवेध', 'शेतकऱ्याचा आसूड', व प्रतिष्ठानच्या अनेक विशेषांकाचे संपादन केले आहे. महात्मा गांधी मिशन, संभाजीनगर, व परळी, माहूर, येथील साहित्य सेवा पुरस्कारा बरोबरच महाराष्ट्र शासनाचा मंगेश पाडगावकर 'भाषा संवर्धन पुरस्कार' प्राप्त आहे.
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे दोन वर्षा पेक्षा जास्त काळ प्रशासक म्हणून कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, भाषा मंडळाचे अध्यक्ष व कला शाखेचे अधिष्ठाता म्हणून कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ते कांहीं काळ हंगामी कुलगुरू म्हणून कार्यरत होते. मराठी भाषेच्या अध्यापनापासून सुरू झालेली मराठी साहित्याची सेवा ते आजही करीत आहेत.
मराठवाडा साहित्य परिषदेचे काही काळ सचिव व २६ वर्षांपेक्षा अधिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले व करीत आहेत. अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे ते तीन वर्षे सचिव व दोन वेळा ६ वर्ष अध्यक्ष म्हणून त्यांनी कारकिर्द गाजवली आहे. नॅशनल बुक ट्रस्ट दिल्लीचे भाषा सल्लागार व साहित्य अकादमी दिल्लीचे व महाराष्ट्र शासन साहित्य पुरस्कार समितीचे पाच वर्षे सदस्य म्हणून काम केले. राष्ट्रीय भाषा चर्चा सत्रातील त्यांचा सहभाग, कार्यशाळेतील त्यांची भाषणे दिशादर्शक ठरली आहेत. २००४ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे पारपडलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ते कार्याध्यक्ष होते. हे संमेलन सर्वार्थाने मराठी साहित्यातील मूल्य संस्कृतीची श्रीमंती दर्शविणारे ठरले होते.
विश्व मराठी साहित्य संमेलनाची कल्पना प्रथम त्यांनी मांडली. प्रचंड टीका व विरोधाला न डगमगता त्यांनी अमेरिका व दुबई येथे ही संमेलने घेतली. मराठवाडा साहित्य परिषदेचा विस्तार व प्रादेशिक संमेलने घेऊन महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. या दोघांच्या साहित्य कार्याचा महत्त्वपूर्ण सहभाग व महत्व पाहता अनुराधाताई पाटील व कौतुकराव ठाले पाटील यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०३ मार्च २०२६

## अ. म. पठाण यांना संत नामदेव साहित्य पुरस्कार प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** हिंगोली येथील समृध्दी संस्थेच्यावतीने हनुमान जयंतीच्या शुभ मुहूर्तावर कवी तथा लेखक अय्युब पठाण लोहगावकर ऊर्फ अ. म. पठाण यांना त्यांच्या उत्कृष्ठ साहित्य लेखनाविषयी संत नामदेव साहित्य पुरस्कार समृध्दी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. अय्युब पठाण यांनी मराठी साहित्य क्षेत्रात गेल्या चाळीस वर्षापासून दर्जेदार साहित्य लेखन केलेले असून त्यांची आज पर्यत अकरा कवितासंग्रह आणि पाच कथासंग्रह असे सोळा पुस्तके प्रकाशित झालेले आहे. या शिवाय बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या इंग्रजी व हिन्दी माध्यमाला " पाणपोई " या कवितेचा अभ्यासक्रमात समावेश आहे. या मराठी साहित्य लेखनाचे योगदान याची योग्य दखल घेऊन अ. म. पठाण यांना सन्मानाचा संत नामदेव साहित्य पुरस्कार सन्मानपूर्वक हिंगोली येथे प्रदान करण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, आणि सन्मानपत्र, शाल श्रीफळ, पुष्पहार असे आहे. यावेळी व्यासपीठावर समृध्दी संस्थेचे संचालक प्रा. डॉ. बाबुराव खंदारे, प्रा. डॉ. नवीन सोळंके हे उपस्थित होते.

## प्रा. डॉ. सतीश मस्के 'मिलिंद सन्मान पुरस्कार'ने सन्मानित



**पिंपळनेर :** येथील कर्म. आ.मा. पाटील कला,वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी आंबेडकरी साहित्य, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना लुम्बिनी उद्यान, मिलिंद महाविद्यालय, क्रांतीभूमी नागसेनवन,छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे नागसेन फेस्टिवल कार्यक्रमात प्राचार्य डॉ.कदम सिने अभिनेते प्रशांत डाळिंबकर ,पंजाबराव मोरे, नागसेन फेस्टिवलचे सचीन निकम यांच्या हस्ते 'मिलिंद सन्मान पुरस्कार'देऊन सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मिलिंद नागसेनवन स्टुडंट्स वेल्फेअर असोसिएशन पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या आजी माजी विद्यार्थ्यांद्वारे गेल्या दहा वर्षापासून ' नागसेन फेस्टिवल ' जल्लोष भीमजयंतीचा व महोत्सव विचारांचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षीही व्याख्याने व इतर कार्यक्रमाचेही आयोजन करून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना "मिलिंद सन्मान पुरस्कार"देऊन गौरविण्यात आले.यावर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार साहित्याद्वारे सामान्य माणसापर्यंत पोहोचवित असल्याबद्दल त्याचबरोबर शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रा. डॉ . सतीश मस्के यांना ' मिलिंद सन्मान पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. प्रा.डॉ.सतीश मस्के यांना या अगोदर शैक्षणिक , सामाजिक व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सात वेळा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे खान्देशातील आंबेडकरी चळवळ खंड १,२,३ त्याचबरोबर आंबेडकरी योध्दा (गौरवग्रंथ), हंबरडा (कथासंग्रह), दाटुन आलेल्या कळा( कवितासंग्रह), माणुसकीचा गहिवर (ललित लेखसंग्रह) असे सात ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत.

त्याचबरोबर त्यांनी विविध साहित्य संमेलनाच्या परिसंवादात, चर्चासत्रात, कवी संमेलनात सहभाग नोंदवला असुन त्यांचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विद्यापीठ स्तरीय अशा विविध पातळीवर शोधनिबंधही प्रकाशित झालेले आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल मित्र परिवाराकडुन त्यांचे अभिनंदन होत आहे.

## कार्यकर्ता हाच पक्षाचा कणा; भाजपच्या बलाढ्यतेचे श्रेय कार्यकर्त्यांच्या निष्ठेला - माजी मंत्री बसवराज पाटील



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** राजकारणात कोणताही पक्ष हा कार्यकर्त्यांशिवाय मोठा होऊ शकत नाही. कार्यकर्ता हा पक्षाचा मुख्य कणा असतो आणि याच कार्यकर्त्यांच्या निष्ठेच्या व कष्टाच्या आधारावर आज भारतीय जनता पक्षाने राज्यात व देशात सत्ता मिळवली आहे. भाजप आज जगातील सर्वाधिक बलाढ्य पक्ष म्हणून नावारूपास आला आहे, त्याचे सर्व श्रेय तळागाळातील कार्यकर्त्यांना जाते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा भाजपचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी केले. बुधवारी (ता. २) रोजी मुरूम येथील विठ्ठल मंदिरात उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाची 'संघटनात्मक आढावा बैठक व बूथ कमिटी चर्चासत्र' उत्साहात पार पडली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनेची बांधणी अधिक मजबूत करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना पाटील यांनी प्रत्येक गावातील वॉर्डनिहाय बूथ कमिटी प्रमुखांनी आपली जबाबदारी ओळखून कार्य करावे, अशा सूचनाही दिल्या.या महत्त्वपूर्ण बैठकीला मंचावर मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते समितीचे सह अध्यक्ष शरण बसवराज पाटील, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालेराव, मदन पाटील, योगेश राठोड, भरत मारेकर, प्रा. शौकत पटेल, उमेश बारकुले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच उमरगा पंचायत समितीचे सदस्य अमर वाले संजय मुळे लोहारा पंचायत समितीचे सदस्य दत्तात्रय वाघमारे,नागनाथ पाटील, व स्वप्नील कारभारी यांच्यासह कारखान्याचे संचालक शिवालिंग माळी लोहारा भाजप अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष रब्बानी नबेगावे, सतिश पवार आणि आलूरचे सरपंच राम जेऊरे, राजू मुल्ला उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्राचार्य उल्हास घुरघुरे तर आभार गटनेते गणेश अंबर यांनी मानले

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०३ मार्च २०२६


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता राष्ट्रीय कार्यशाळा आणि आयडिया थॉन पोस्टर, मॉडेल, डेमो स्पर्धा

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार अभ्यासक्रमामध्ये संशोधन प्रकल्प, फिल्ड प्रोजेक्ट, ऑन जॉब ट्रेनिंग, इंटर्नशिप याचा समावेश केला आहे. पदवी आणि पदवीधर वर्गामध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाचा योग्य वापर करता यावा. आणि त्या नुसार त्यांना उद्योग व्यवसाय किंवा करिअरची संधी मिळावी.तसेच संशोधनामध्ये गोडी निर्माण व्हावी चांगले संशोधक निर्माण व्हावी व्हावे म्हणून श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा, अंतर्गत गुणवत्ता नियंत्रण कक्ष, वाणिज्य संशोधन केंद्र, महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करिअर कट्टा आणि पुणे येथील इएनएसआयएन फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने AI in Research Design, Creativity, Innovation and Entrepreneur: NEP 2020 activities Research Project, Field Project, OJT/Internship या विषयावर एक दिवस राष्ट्रीय कार्यशाळा शनिवार दिनांक 4 एप्रिल 2026 रोजी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत आयडिया थोन या संकल्पनेवर आधारित क्रिएटिव्हिटी इनोव्हेशन स्टार्टअप टू इंटर या अंतर्गत युवकांच्या , विद्यार्थ्यांच्या नवनवीन आयडिया चे पोस्टर/ डेमो/ मॉडेल /पोस्ट सादरीकरण स्पर्धा आयोजित केली आहे.या कार्यशाळेचे उद्धाटनमहाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे यांच्या हस्ते आणि भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय अमोल शिवाजीराव मोरे यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे एखादी शेळीसाठी प्रमुख उपस्थिती मा आश्लेष भैय्या मोरे, उपाध्यक्ष मा जनार्दन साठे सरचिटणीस मा पद्माकरराव हराळकर, सचिव डॉक्टर सुभाष वाघमोडे, सहसचिव यांची उपस्थिती आहे.कार्यशाळेसाठी पुणे येथील पुष्कराज कंपनीचे ग्रुप ग्रुप ऑफ कंपनीचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर शैलेंद्र गोस्वामी यांचे संशोधन आणि संशोधन आराखडा यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावर ब्रिज भाषण होणार आहे तसेच नवीन शैक्षणिक धोरण आणि जागतिक युद्धाच्या संकटात उद्योजकाचे उद्योजकतेला संधी या विषयावर प्रोफेसर डॉक्टर सय्यद अझरुद्दीन प्रोफेसर कॉमर्स डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांची दोन सेशन होणार आहेत तसेच डॉक्टर शैलेश वादेर डायरेक्टर इन्फॉर्मेशन अँड लिंकेजेस स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा युनिव्हर्सिटी तसेच प्रोफेसर शिवकुमार दिनी दिन सेंट्रल युनिव्हर्सिटी कर्नाटक यांचे मार्गदर्शन होणार आहेया कार्यशाळेत पोस्टर्स स्पर्धेसाठी युवक, पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी स्टुडन्ट इनोव्हेटिव्ह आयडिया अवॉर्ड तर संशोधक विद्यार्थ्यांसाठी रिसर्च स्कॉलर इनोव्हेटिव्ह आयडिया अवॉर्ड देण्यात येणार आहे. त्याचबरोबर स्पर्धेसाठी रोख रक्कम व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तरी या कार्यशाळेस प्राध्यापक, पदवी आणि पदव्युत्तर आजी आणि माजी विद्यार्थी तसेच संशोधन केंद्रातील पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना सहभाग घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संजय अस्वले आणि संयोजन समितीने केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## वरिष्ठ गट पुरुष व महिला व्हॉलीबॉल निवड चाचणी स्पर्धा

**कन्नड (कृष्णा शिंदे) :** महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशन मार्फत आयोजित ५६ वी वरिष्ठ गट पुरुष व महिला व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन दिनांक ९ ते १२ डिसेंबर दरम्यान नागपूर या ठिकाणी आयोजित केलेली आहे या स्पर्धेत भाग घेण्यासाठी छत्रपती संभाजीनगरचा पुरुष व महिला संघ निवडण्यात येणार आहे . हि निवड चाचणी दिनांक ५/०४/२०२६ रोजी संध्याकाळी ४ वाजता स्वामी विवेकानंद कॉलेज छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे यामधून जिल्ह्याचे पुरुष व महिला संघ निवडण्यात येणार आहेततरी या निवड चाचणी स्पर्धेत ज्यास्तित जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे अवाहन छत्रपती संभाजीनगर व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष . रफत सर . उपाध्यक्ष . उन्मेश शिंदे व सचिव सतीश पाठक प्रविण शिंदे यांनी केले आहे. संपर्क क्रमांक. ९४२३७४५२५८

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते ऊसतोड कामगारांना ओळखपत्रांचे वितरण




**बीड (भगवंत पाळवदे) :** ऊसतोड कामगारांच्या समस्यांबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश राज्य शासनास दिले. त्या अनुषंगाने राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित केली आहे. सदर समितीची बैठक दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये किमान ३ वर्षापासुन ऊसतोड कामगार म्हणून काम करीत असलेल्या ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून नोंदणी करणे व त्यांना ओळखपत्र देणे या विषयावर सविस्तर चर्चा झाली. ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी करणे व त्यांना ओळखपत्र देण्यासाठी शासनाने स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या संस्थेची नियुक्ती केली आहे.बीड जिल्ह्यात ऊसतोडणी कामगाराच्या सर्वेक्षणाचे काम सुरू झाले असून दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर एकूण ५८४५ ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते १ एप्रिल २०२६ रोजी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत प्रातिनिधिक स्वरूपात १० ऊसतोड कामगारांना ओळखपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ, पोलीस उपअधीक्षक (गृह) उमाशंकर कस्तुरे, स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड यांचे प्रतिनिधी सागर बोरा, सहायक आयुक्त, समाजकल्याण प्रदिप भोगले हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांनी संस्थेच्या प्रतिनिधीना ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षणाचे काम जिल्हा प्रशासनाशी समन्वय ठेवून पुढील तीन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या तसेच खऱ्या ऊसतोड कामगारांची नोंदणीच्या सूचना दिल्या. सोबतच बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांना संबंधित संस्थेकडे नोंदणी करण्यासाठी स्थानिक पातळीवर संपर्क करण्याचे आवाहन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०३ मार्च २०२६


## ओला होत नाही मी

किती‍ही पाऊस आला तरी
ओला होत नाही मी
डोळ्यांत थेंब साठूनही
आसवांना अर्थ उरत नाही

पडत राहतात अलगद
पाऊस धारा देहावर
फुटत नाही कोंभ हिरवा
दुष्काळी शेतशिवारावर

कितीही पडले ऊन तरी
झळ त्याची लागत नाही
पोळलेली जिंदगी आता
उन्हालाही घाबरत नाही

जखमा इतक्या खोल उरी
खपलीही धरत नाही
बोथट साऱ्या वेदनावर
फुंकर कामी येत नाही

ऋतू हिवाळा असला तरी
थंडी काही जाणवत नाही
हुडहुडी काळजाची
काही केल्या थांबत नाही

सगळं काही ठीक होईल
ही चक्क थाप आहे
स्वप्नाच्या निखाऱ्याला
राखेचाच शाप आहे

हसरा चेहरा घेऊन आता
जगामध्ये फिरतो आहे
गोठलेल्या जगण्याला
दिशा नवी देतो आहे

**कवी ज्ञानेश्वर गायके**

# टेरेसवरील कवितांची अवीट मैफल..

**शे**जारील देशात युद्धाचे नगारे वाजत असताना,काही देश एकमेकांना नष्ट करण्याची भाषा आणि कृती करत असताना कवी मात्र माणुसकीच्या,मानवतेच्या ,शांततेच्या कविता पेरतात आणि या जगाला पुन्हा मानवतेचा धर्म शिकवतात.कविता समाज बदलू शकते,कविता जग बदलू शकते ह्या विचाराने कवी एकत्र येतात आणि शब्दांचे वाण वाटतात..प्रत्येक महिन्याला शहरातील काही कवी आपल्यापैकीच कुण्या एका कवीच्या गच्चीवर जमतात आणि एकमेकांना कविता ऐकवतात.कवितेच्या ह्या बहारदार मैफलीत दोन-तीन तास कसे निघून जात कळतच नाही.मार्च महिन्याची टेरेसवरील काव्य मैफल कवयित्री दिपाली कुलकर्णी ह्यांच्या टेरेस वर फुलझाडांच्या साथीने उत्तरोत्तर रंगत गेली.शहरातील कवी-कवयित्री ह्यांनी दर्जेदार स्वालिखित कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.यावेळी महाविद्यालयीन युवा कवींची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.कुणी मनाचा ठाव घेणाऱ्या गझला सादर केल्या,तर कुणी भोवतालचे वास्तवचित्र कवितेतून रेखाटले,कुणी प्रेमावर व्यक्त झाले तर कुणी नात्यांच्या परिस्थितीवर बोलले.काही छंदोबद्ध तर काही मुक्त छंदातील कवितांनी मनाचा ठाव घेतला.जवळपास 30-35 कवींनी विविध विषयाच्या,आशयाच्या दर्जेदार कविता सादर केल्या.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून छ.संभाजीनगर आकाशवाणीचे मुख्य अधिकारी श्री सुजित बनसोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन युवा कवी अर्जुन गायकवाड,अजय त्रिभुवन,सुशील सातपुते,महेश अचिंतलवार ह्यांनी केले.तर दीपाली कुलकर्णी ह्यांनी आभार व्यक्त केले.गिरीश जोशी ह्यांनी प्रास्ताविक केले.नवोदितांना हक्काचे व्यासपीठ मिळावे ,कवितेची चळवळ अखंड सुरू रहावी ह्या हेतूने हा कवींचा परिवार टेरेसवरील कविता उपक्रम मोठ्या उत्साहाने एक व्रत म्हणून चालवत आहे.शहरातील प्रस्थापित तसेच नवोदित कवी ह्या चळवळीत आनंदाने सामील होत असतात.गेल्या सात-आठ वर्षांपासून कवी गिरीश जोशी ह्यांच्या संकल्पनेवर आधारित टेरेसवरील कवितांची मैफल आता लोकप्रिय होऊ लागली आहे.

रिकामी होत आहे रोज घागर
कुणाचे दु:ख मी आहे मनोहर

तुझे माझे किती नुकसान झाले
कमी पडतील मापे मोजले तर

**#मनोहरकाकडे**

आठवत नाही अता केव्हातरी आलो
आज मी ही खूप दिवसांनी घरी आलो

एकटीने भोगते आहेस तू सारे
मी तुझ्या दु:खामध्ये वाटेकरी आलो
देउनी जाईन मी काहीतरी नक्की
या जगामध्ये रित्या हाती जरी आलो

**अजय त्रिभुवन**

भोंदूगिरीत अडकुन पडलेय गाव आता
झाला गुलाम आहे तो भक्तिभाव आता

ज्याला कळले नाही भविष्य स्वत:चे
अंकशास्त्राने घेती भक्तांचा ठाव आता

**कवी डॉ सुशिल सातपुते**

मी झाड तोडलं
मग झाडाचं
लाकूड केलं
लाकडाचा ब्रश केला
त्या ब्रशने मी
निसर्ग चित्र काढले
बघणारे सगळेच
माझं कौतुक केले
काही लेकरं म्हणाली
आम्हाला हि चित्र शिकवा
मी त्यांचे बोट धरुन
आधी त्यांना झाड लावायला सांगतो
आणि
माझी रक्ताळलेली बोटं
हिरवीगार होतात

**सुनील उबाळे**

वकालत करती लड़कियाँ
ज़रा मुँहफ़ट होती हैं!
जनाब ऐसी मुँहफ़ट लड़कियाँ
भला किसको भाती हैं?
ख़ुद-एतमाद कारी कारी चमकती आँखें,
करारी आवाज़—
जब शब्दों को साझा करती हैं,
तो इनक़िलाब कर जाती हैं!
नूर साथ लिए चलती है
कमाल ख़ूबसूरत दिखती हैं
ये मुँहफ़ट लड़कियाँ...!

**• भावना मोगल***

तिच्या पापणकाठावरून
ओघळणाऱ्या मोत्याची
धास्ती होती काळजात?
नव्हतीच!
पण हा सलणारा शहारा
कायम देहावर...
म्हणून तर निसटत होता

शेल्याला शब्द दे
शहारा बोलू देत...
तुला पांघरून घ्यावं म्हणते!..

**-मनस्विनी मृणाल देशपांडे**

वसंत यायची उगाच वाट का
बघायची?
ऋतू बघून का कधी फुले इथे
फुलायची?

उन्हात चाललो तरी मनात ओल
ठेवतो
म्हणून पावसावरी गझल मला
सुचायची !

**_ऋषभ कुलकर्णी**

# अश्लील गाण्यावरून हायकोर्टाने हनी सिंग-बादशाहला फटकारले



**दिल्ली :** उच्च न्यायालयाने गुरुवारी गायक हनी सिंग आणि बादशाह यांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली आहे. न्यायालयाने त्यांचे सुमारे दोन दशके जुने वादग्रस्त गाणे 'माफिया मुंडीर' वॉल्यूम १ इंटरनेटवरील सर्व प्लॅटफॉर्मवरून तात्काळ हटवण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने या गाण्याचे बोल 'अत्यंत अश्लील' आणि महिलांप्रती अपमानजनक असल्याचे म्हटले आहे.

न्यायमूर्ती पुरुषेंद्र कौरव यांच्या न्यायालयाने हनी सिंग आणि बादशाह यांना नोटीस बजावून कठोर निर्देश दिले आहेत. न्यायालयाने म्हटले की, गाण्याचे शीर्षक आणि बोल इतके आक्षेपार्ह आहेत की ते अधिकृत आदेशात लिहिणे देखील शक्य नाही. न्यायालयाने निर्देश दिले की, गुगल, यूट्यूब आणि स्पॉटिफाय सारख्या सर्व संगीत आणि व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्मवरून या गाण्याची मूळ आवृत्ती, रीमिक्स आणि यूआरएल तात्काळ ब्लॉक केले जावे.

न्यायमूर्ती कौरव यांनी त्यांच्या दालनात गाणे ऐकल्यानंतर आणि त्याचे बोल वाचल्यानंतर तीव्र टिप्पणी केली. ते म्हणाले, हे अशा निवडक प्रकरणांपैकी एक आहे, ज्याने न्यायालयाच्या सद्सद्विवेकबुद्धीला आतून हादरवून टाकले आहे. हे दुर्दैवी आहे की गाण्याचे बोल महिलांचा अपमान करतात आणि त्यांना थट्टेचे पात्र बनवतात. यात कोणतेही कलात्मक किंवा सामाजिक मूल्य नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की कलात्मक अभिव्यक्तीच्या नावाखाली अशी अश्लीलता सहन केली जाणार नाही.ही कारवाई हिंदू शक्ती दलाच्या याचिकेवर झाली आहे. याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला होता की हे गाणे डिजिटल प्लॅटफॉर्मवर सहज उपलब्ध आहे आणि तरुणांवर चुकीचा परिणाम करत आहे. याचिकाकर्त्यांने न्यायालयाला सांगितले की, अलीकडेच एका कॉन्सर्टदरम्यान हनी सिंगने या गाण्याच्या काही ओळी गायल्या होत्या, ज्यामुळे हे गाणे त्याचेच असल्याचे सिद्ध होते. यानंतर न्यायालयाने केंद्र सरकारलाही वादग्रस्त लिंक ब्लॉक करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयाने म्हटले की, सार्वजनिक व्यासपीठांवर अशी सामग्री प्रसारित करणे, जी अल्पवयीन मुलांसाठीही उपलब्ध आहे, समाजासाठी योग्य नाही. न्यायमूर्ती कौरव म्हणाले, समाजात शालीनतेच्या मानकांकडे दुर्लक्ष केले जात आहे. कायद्यानुसार चालणारा कोणताही सुसंस्कृत समाज अशा आशयाला पैसे कमावण्याचे साधन बनण्याची परवानगी देऊ शकत नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ७ मे रोजी निश्चित करण्यात आली आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०३ मार्च २०२६


## मिनाक्षी पवार यांची जि.प. महिला बालकल्याण सभापती पदी निवड



**कन्नड (अरुण थोरात) :** चापानेर जिल्हापरिषद गटा च्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या मिनाक्षी किशोर पवार यांची जिल्हा परिषद संभाजीनगर च्या महिला बालकल्याण सभापती पदी निवड झाल्याने कार्यकर्ते, नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.कन्नड तालुक्यातील चापानेर जिल्हा परिषद गटावर स्व.नारायणराव पवार यांच्या परिवाराचे गेली चार पाच पंचवार्षिक पासून वर्चस्व राहिले आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हापरिषद निवडणुकीत ही मा.जि.प.सदस्य किशोर आबा पवार यांच्या पत्नी तथा मा.मंत्री बबनराव लोणीकर यांच्या कन्या मिनाक्षी पवार यांनी भाजप च्या तिकिटावर दणदणीत विजय मिळवित सत्ता काबिज केली. भाजप ने जिल्हा परिषदे वरती सत्ता मिळवित अध्यक्ष व उपाध्यक्ष मिळवित, मित्र पक्ष शिवसेनेला धक्का दिला होता. त्यामुळे जिल्हा परिषदेत तालुक्याला कोणते सभापती पद मिळते याकडे तालुक्याचे लक्ष लागले होते. दि.०२ एप्रिल रोजी झालेल्या विविध सभापती पदांच्या निवडीत महिला बालकल्याण सभापती पदाची माळ मिनाक्षी पवार यांच्या गळ्यात पडल्याने कार्यकर्ते, ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.या निवडी बद्दल भाजप संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, राज्य कार्यकारणी सदस्य तथा जिल्हापरिषद सदस्य डॉ. संजय गव्हाणे, जिल्हापरिषद सदस्या मंजुषा मलदुडे, भाजप जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, भाजप पश्चिम मंडलाध्यक्ष ललित सुरासे, मा. पंचायत समिति उपसभापती सुनिल निकम, अरुण थोरात, भावेश शिंदे, सुदाम पवार, दिनकर दाभाडे, रतन मधे, आदींनी अभिनंदन केले आहे.

## देवगिरी चे राजा रामदेव राय यांचे कुलदैवत नवसाला पावणारी रासाई माता यात्रा महोत्सव साजरा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** येथील देवगिरी किल्ल्याच्या दक्षिण भागाच्या गुहेत निसर्गरम्य वातावरणात बाराव्या शतकातील यादव कालीन मंदिर आहे दौलताबाद बस स्टॅन्ड वर उतरून कमानीतून दक्षिण बाजूला गेल्यावर उजव्या बाजूला डोंगराच्या गुहेत प्राचीन मंदिर आहेदेवगिरी चे राजा रामदेव राय यांच्या ते कुलदैवत होते. या मंदिराच्या चोहीबाजुनी पाण्याने भरलेले खंदक आहेदि 02 गुरुवारी रोजी चेत्र पौर्णिमेला यात्रा चे आयोजन करण्यात आले होतेनवसाची बारा गाडे ओढून नवस फेडले गेले पंचक्रोशीतील भावीक बरोबर येथे श्रीरामपूर,बाभळेश्वर ,अमरावती, बीड,पुणे,मुंबई, लातूर, वैजापूर, बेलापूर (नगर) येथील भाविक दर्शनासाठी येत असत .पौर्णिमेला देवीला पुरणपोळी चे नेवेद्य दिला जातो .देवीला मास वगैरे चालत नाहीत याची माहिती पुजारी निलेश कृष्णा आगळे यांनी दिली रासाई मातांचे मंदिर हे पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत आहे बाराव्या शतकातील या बहुतांशी जिर्णो अवस्थेत आहे पायऱ्या बहुतांशी ठिकाणी तुटलेल्या आहे याची डागडुजी करावी तसेच मंदिराकडे जाण्यासाठी पक्का रस्ता करावा ,लाइट व्यवस्था, थांबण्यासाठी पत्राचे शेड व पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून करून देण्यात अशी मागणी पुरातत्व विभागाने करून द्यावी अशी मागणी भाविक, ग्रामस्थांनी केली आहे.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सिनियर फेलो आणि महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जलतज्ञ पाणीप्रश्नाचे अभ्यासक डॉ. किशोर सूर्यवंशी यांच्या वाढदिवसानिमित्त मित्रपरिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे, विद्यापीठाच्या विद्यार्थी सेना प्रमुख डॉ. तुकाराम सराफ, विद्यार्थी नेते डॉ. नामदेव कचरे, सामाजिक कार्यकर्ते राजेश लहरे , दैनिक महाराष्ट्र जनशक्ती आणि एमजे न्यूज चे मुख्य संपादक प्राचार्य डॉ.हसन इनामदार आणि इतर दिसत आहेत**

## खुलताबाद तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट; शेतीचे नुकसान



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पावसाचा जोर वाढला असून बुधवारी सायंकाळी झालेल्या वादळी वारा,अवकाळी पावसासह गारपिटीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.भर उन्हाळ्यात अचानक पडलेल्या पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला,तरी या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाल्याने त्यांच्यावर संकट ओढवले आहे. खुलताबाद तालुक्यात निरगुडी बु,खु, ठाकरवाडी,पिं प्री, पळसगाव, तिसगाव,अशा विविध ठिकाणी झालेल्या गारपिटीमुळे काढणीला आलेली पिके कांदा, गहू, मका तसेच बिजवाई ( कांद्याचे बी),हरबरा, बाजरी,टरबुज,आंबा, या पिकांना मोठा फटका बसला. यांसारखी आता तोंडाशी आलेली पिके अक्षरशः जमीनदोस्त झाली गारांच्या माऱ्यामुळे झाडांची पाने गळून पडली. उन्हाळी बाजरीचे पीक भरभरून आलेले असतांना जोरदार वादळी वाऱ्यामुळे जमीनदोस्त झाली आहे त्याचबरोबर यावर्षी आंब्याचा बहर खुप चांगला आलेला असतांना वादळी वाऱ्यामुळे,गारांमुळे आंब्याच्या झाडांवरील कच्च्या कैऱ्या गळून पडल्याने आंबा बागायतदारांना मोठा फटका बसला आहे अनेक ठिकाणी गव्हाची कापणी व कांद्याची काढणी सुरू असतानाच अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. आधीच शेतीमालाला समाधानकारक दर मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत असताना या अवकाळी पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. काढलेला गहू व कांदा वाचवण्यासाठी शेतकऱ्यांनी पिके झाकण्याची धडपड केली.

## निधन वार्ता



**छत्रपती संभाजीनगर :** येथील कमलाकर खुंटे मुर्तडकर यांचे १ एप्रिल बुधवारी रात्री ८४ व्या वर्षी निधन झाले. त्याच्यावर एन ११ स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अनिल खुंटे, सुनिल खुंटे, मंदा राजहंस यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन सुना, मुलगी, जावई नातवंडे असा परिवार आहे


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |